रामटेक विकास आराखडयास
प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक-एमयुएन-२०१५/प्र.क्र.१२७/नवि-१८

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक :- ०६ फेब्रुवारी, २०१६.

वाचा :- १) शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक एमयुएन-५६९०/२७४०/प्र.क्र.१०१/९१/नवि-१८, दिनांक १७ डिसेंबर १९९२
२) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. निशा/राविका/सांस/२०१५/२४८, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५,

प्रस्तावना :-

रामटेक शहर येथे गडमंदिर कालिदास स्मारक व रामटेक शहर विकासाच्या संदर्भात नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमयुएन-५६९०/२७४०/प्र.क्र.१०१/९१/नवि-१८, दिनांक १७ डिसेंबर १९९२ अन्वये रामटेक यात्रा स्थळाचा विशेष विकास कार्यक्रमाकरिता रुपये २१०.२५ लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर हे नियंत्रक अधिकारी म्हणून व स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयान्वये या कार्यक्रमाचे समन्वयन अधिकारी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना आवश्यक सल्ला देण्यासाठी सल्लागार समिती गठीत करण्यात आली आहे. आता विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये ₹ ४.४४ कोटी किमतींच्या कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव व निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सन २०१४-२०१५ चे अर्थसंकल्पिय भाषणात असे घोषित करण्यात आले होते की, नागपूर जिल्हयातील सुप्रसिध्द पुरातन रामटेक गडमंदिर देवस्थान परिसराचा विकास करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या अनुषंगाने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. याबाबत सर्व संबंधीतांसोबत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार रामटेक शहर येथील गडमंदिर, कालिदास स्मारक व रामटेक शहर विकास आराखडयाच्या संदर्भात प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

२.शासन निर्णय :-

रामटेक शहर येथील गडमंदिर, कालीदास स्मारक व रामटेक शहर विकास आराखडा ₹ ४.४४ कोटीच्या आराखडयास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. यातील कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे:-

अ.क्र.	संबंधित यंत्रणा	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय किंमत (लाखात)
१	२	३	४
१	सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नागपूर	१) वराह मंदिर जतन दुरुस्ती व मंदिर परिसराचे सौदर्यीकरण कामे, गडमंदिर कामे, गडमंदिर रामटेक जिल्हा नागपूर	७०.२९
		२) कपटराम मंदिर व धुम्रेश्वर गेट जतन दुरुस्ती व सौदर्यीकरण कामे, गडमंदिर रामटेक तालुका रामटेक जिल्हा नागपूर	८५.३२
		३) केवल नरसिंह मंदिर परिसर सिमाभिंत व इतर कामे, गडमंदिर रामटेक तालुका रामटेक जिल्हा नागपूर	७१.३२
		४) रुद्र नरसिंह मंदिर परिसर सिमाभिंत व इतर कामे, गडमंदिर रामटेक तालुका रामटेक जिल्हा नागपूर	१४.२३
		५) भैरव दरवाजा ते वराह दरवाजा पर्यंत दगडी पेव्हमेंट करणे गडमंदिर रामटेक तालुका रामटेक जिल्हा नागपूर	४७.५३
२	प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर	**दिशादर्शक माहिती फलके** गडमंदिर, रामटेक खात भंडारा रोड, तालुका रामटेक जिल्हा नागपूर	१९.८९
		शांतीनाथ मंदिर, रामटेक तुमसर रोड, रामटेक-खात रोड तालुका रामटेक जिल्हा नागपूर	१९.९०
		खिंडसी वॉटर स्पोर्टस क्लब आणि रामटेक-मौदा रोड रामटेक जिल्हा नागपूर	१९.६३
		कालिदास स्मारक तालुका रामटेक जिल्हा नागपूर	१९.६२
		अंबाडा तलाव, वराह मंदिर आणि रामटेक - नागपूर रोड आणि नागपूर शिवनी, कपूर बावडी ता. रामटेक जि. नागपूर	१९.६३
३	नगर परिषद, रामटेक	१) गडमंदिर येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था	४२.७८
		२) रामतलाई मैदान परिसराचे सौदर्यीकरण करणे	१४.११
		एकूण	**४४४.२५**

भैरव दरवाज्यातील शिरपुर गेट या परिसरात पुजेचे साहित्य व इतर किरकोळ बाबी विक्रीकरिता खोल्या व त्यावर निवासी खोल्यांचे बांधकाम याबाबत अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

३. सदर प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे :-

अटी व शर्ती :-

१) प्रस्तुत प्रकल्प राबविण्यापूर्वी सदरहू आराखडयातील प्रत्येक कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकांना सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

२) प्रस्तुत प्रकल्प राबविण्यापूर्वी तो ज्या जमीनीवर राबविण्यात येणार आहे, त्या जागा संबंधीत प्रशासकीय विभागास हस्तांतरीत करणे अथवा संबंधीतांकडून आवश्यक ते ना-हरकत घेणे आवश्यक राहील.

३) प्रस्तुत प्रकल्प राबविण्यापूर्वी पर्यावरणीदृष्टया आवश्यक त्या सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यकती ना-हरकत घेण्यात यावी.

४) नियोजन विभागाच्या दिनांक ४ जुन, २०१५ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे लागु असतील त्यानुसार पालन करावे लागेल.

५) मंजुर तरतुदीतुन करावयाचा खर्च अन्यथा नमुद नसल्यास ३१ मार्च, २०१६ पर्यंत करण्यात यावा व मंजूर कामे तात्काळ पूर्ण करावीत.

६) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तीय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

७) अशा प्रत्येक योजनेबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमांप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र ५, दि. ६ फेब्रुवारी, २००२ च्या सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र. बीजीटी-१०.००/प्र.क्र.५६/२०००/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंत करण्यात यावी.

८) रस्त्यांच्या प्रस्तावित कामांच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

९) योजनेतर स्वरुपाच्या कामासाठी (देखभाल / दुरुस्ती इ.) सदरची तरतूद उपयोगात आणली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०) सदर कामांच्या पूर्णत्वानंतर त्या संदर्भातील देखभाल/दुरुस्ती, संबंधित संस्थेने करण्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांबरोबर करारनामा करणे बंधनकारक राहील. अशा प्रकारच्या देखभाल दुरुस्तीकरिता शासनाकडून यापुढे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी व तशी अट करारात अंतर्भूत करण्यात यावी.

११) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालीची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी संबंधीत यंत्रणांची राहील.

१२) सदर निधीतून होणाऱ्या खर्चातून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती तसेच निधीतून होणाऱ्या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणत्र न चुकता संबंधीत यंत्रणा व शासनास सादर करण्यात यावे.

१३) या प्रकल्पासाठी होणाऱ्या शासकीय खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधीत यंत्रणा व शासनास विहित कालमर्यादेत सादर करण्यात यावीत.

१४) उपरोक्त कामासाठीच्या तीनही अंमलबजावणी यंत्रणांचे समन्वयन अधिकारी जिल्हाधिकारी, नागपूर हे राहतील.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-विअप्र-१००८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दिनांक १५ मे, २००९ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-१ उपविभाग-३ अ.क्र.४ परिच्छेद क्रमांक-२७(२)(अ) प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च या विभागाच्या सीआरसी प्रधान लेखाशिर्ष २२१७, नगर विकास उपलेखाशिर्ष ८०, सर्वसाधारण गौण लेखाशिर्ष १९२, नगरपरिषदांना सहाय्य गट लेखाशिर्ष (००)(१४) नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहाय्यक अनुदान या अंतर्गत नियोजन विभागामार्फत या कामी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ९/१४४३, दिनांक १२ /०१/२०१६ अन्वये देण्यात आलेल्या सर्व साधारण सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०२०६१२१३२७०३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anish Raman Parshurame

Digitally signed by Anish Raman Parshurame
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ec58fef33f1b3244a3957d134f915dcb444ab4953880ff670e5eca3d7a9f53b, cn=Anish Raman Parshurame
Date: 2016.02.06 12:23:22 +05'30'

(अनिष परशुरामे)
शासनाचे उपसचिव

प्रति :-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा. मंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव,
३) मा. मंत्री, ऊर्जा नवीन व नवीकरणीय ऊर्जा तथा पालकमंत्री नागपूर यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव
५) नागपूर जिल्हयातील संबंधित संसद सदस्य, विधानसभा/विधानपरिषद सदस्य
६) मा. अध्यक्ष, नागपूर जिल्हा परिषद, नागपूर

७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८) अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव(नवि-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सचिव(नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) विभागीय आयुक्त , नागपूर विभाग, नागपूर
१२) जिल्हाधिकारी नागपूर, नागपूर
१३) सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नागपूर
१४) प्रादेशिक व्यवस्थापक महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर
१५) नगर परिषद रामटेक, जि. नागपूर.
१६) सह सचिव, नवि-१६
१७) निवड नस्ती, कार्यासन नवि-१८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.